**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून आचार्य देवव्रत यांचा उद्या शपथविधी

- मराठा ओबीसी आरक्षणावरून सुरु असलेल्या संघर्षावर सर्वांनी एकत्रित चर्चा करून मार्ग काढला पाहिजे, अशी शरद पवार यांची भूमिका

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड

- हिंसक कारवायात सहभागी असल्याचा आरोप असलेल्या जहाल नक्षलवाद्याला भामरागड इथून अटक

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान आमने-सामने

**<><><><><>**

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, हे उद्या महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतील. उद्या सकाळी ११ वा. त्यांचा शपथविधी होईल. या शपथविधी समारंभासाठी त्यांचं आज मुंबईत आगमन झालं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर त्यांचं स्वागत केलं. त्यांना रेल्वे पोलिसांच्या वतीनं आणि त्यानंतर राजभवनात पोहोचल्यावर मुंबई पोलिसांच्या वतीनं मानवंदनाही देण्यात आली.

सी.पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपती पदावर निवड झाल्यानंतर ते महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाच्या जबाबदारीतून मुक्त झाले होते. त्यानंतर राष्ट्रपतींनी सध्या गुजरातचे राज्यपाल असलेल्या आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचीही अतिरिक्त जबाबदारी सोपवली होती.

**<><><><><>**

राज्यात मराठा ओबीसी आरक्षणावरून सुरु असलेल्या संघर्षावर सर्वांनी एकत्रित चर्चा करून मार्ग काढला पाहिजे, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राज्यस्तरीय शिबीरच्या पार्श्वभूमीवर बातमीदारांशी बोलत होते. आज वेगवेगळ्या समाजांच्या समित्या नेमल्या जात आहेत. मात्र सरकार हे एका जातीचं किंवा समाजाचं नसून सर्वांचं आहे. म्हणून अशा समित्यांची नियुक्ती करताना व्यापक दृष्टिकोन ठेवला पाहिजे, असं ते म्हणाले.

आम्हाला सामाजिक ऐक्य हवं आहे. महाराष्ट्राचं वैशिष्ट्य असलेला सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी काही व्यापक कार्यक्रम घेण्याचा प्रयत्न करू, असं पवार यांनी सांगितले. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या मागं आपला हात असल्याचा पवार यांनी इन्कार केला.

पक्षाच्या शिबिरातही त्यांनी ही भूमिका अधोरेखित केली. राज्य सरकारनं आरक्षणाच्या बाबतीत आपली भूमिकेबाबत अद्यापही कोणती स्पष्टता आलेली नाही, त्याऊलट राज्य सरकार समाजात कटुता वाढेल असे निर्णय घेत आहे अशी टीका त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या बाबतीत केंद्र आणि राज्य सरकार बघ्याची भूमिका घेत असेल तर त्यांना ठोस पावलं उचलायला भाग पाडण्यासाठी आपल्या पक्षानं कार्यक्रम हाती घ्यायला हवा असं आवाहन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केलं.

केंद्र सरकारच्या धोरणामुळे आज शेजारचे देश भारतासोबत राहीलेले नाहीत अशी टीका केली. अमेरिकाही प्रत्येक बाबतीत आपल्यावर स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागवू पाहत आहे.

<><><><><>

वस्तू आणि सेवा कराअंतर्गत केंद्र सरकारनं आरोग्य क्षेत्राशी संबंधित केलेल्या कर सुधारणांमुळे औषधं, वैद्यकीय उपकरणं आणि उपचार स्वस्त होणार आहेत. याबाबत अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड - व्हॉईस कास्ट**

जीएसटीमध्ये झालेल्या सुधारणांनुसार, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या ३६ जीवरक्षक औषधांवरचा वस्तू आणि सेवा कर रद्द केला असल्यानं उपचारांवरच्या खर्चात मोठी बचत होईल. या व्यतिरिक्त, गॉझ, बँडेज, रोगनिदान चाचणी संच, ग्लुकोमीटर आणि थर्मामीटर यांसारख्या विविध वैद्यकीय उत्पादनांवरील जीएसटीही १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. चष्मा आणि कॉन्टॅक्ट लेन्सेस यांच्यावरचा कर कमी करून ५ टक्के इतका कमी केला आहे.

आरोग्य विमा आणि आयुर्विम्याच्या प्रीमियमवरही आता शून्य जीएसटी लागू झाल्यानं प्रीमियमची रक्कमही लक्षणीयरीत्या कमी होईल. औषध आणि विमा, अशा दोन्ही क्षेत्रात काम करणारे संतोष गायकवाड याबाबत म्हणाले…

**होल्ड -बाईट - संतोष गायकवाड**

तर विमा क्षेत्रात काम करणारे अभिषेक परब म्हणाले…

**होल्ड… बाईट - अभिषेक परब**

**<><><><><>**

सातारा इथं होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या आज पुण्यात झालेल्या बैठकीत एकमतानं ही निवड झाल्याचं महामंडळाचे सदस्य प्राध्यापक रामचंद्र काळुंखे यांनी आकाशवाणीला सांगितलं. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह राजे

भोसले हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असतील. पुढल्या वर्षी १ ते ४ जानेवारी दरम्यान हे संमेलन होणार आहे.

विश्वास पाटील हे निवृत्त सनदी अधिकारी असून पानिपत, पांगिरा, संभाजी, झाडाझडती यासह अनेक कादंबऱ्याचं लेखन त्यांनी केलं आहे. झाडाझडती या त्यांच्या कादंबरीला १९९२ चा साहित्य अकदमी पुरस्कार मिळाला होता. तसंच विश्वास पाटील सध्या साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आहेत.

<><><><><>

शंकर भिमा महाका या जहाल नक्षलवाद्याला पोलिसांनी भामरागड तालुक्यातल्या तिरकामेटाच्या जंगलातून आज अटक केली. त्याच्यावर हत्या, जाळपोळ, भूसुरुंगस्फोटासह अनेक हिंसक कारवायात सहभागी असल्याचा आरोप आहे.

२१ जानेवारी २०२२ रोजी भामरागड तालुक्यातील डराज-इरपणार मार्गावरल्या पेनगुंडा रस्त्याच्या कामावरल्या १९ वाहनांची जाळपोळ नक्षलवाद्यांनी केली होती. तसंच १५ नोव्हेंबर २०२३ ला लाहेरी इथं एका युवकाची हत्या करण्यात आली होती. या दोन्ही प्रकरणात शंकर महाकाचा शोध राष्ट्रीय तपास यंत्रणा घेत होती, असं पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

<><><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत दुबई इथं आज भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये सामना होणार आहे. रात्री आठ वाजता खेळाला सुरुवात होईल. गेल्या फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत.

<><><><><>

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या विजेतेपदाच्या आशा आज फोल ठरल्या.

पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात लक्ष्य सेन चांगली कामगिरी करु शकला नाही. अवघ्या पाऊण तासात संपलेल्या या सामन्यात चीनच्या ली शी फेंगनं लक्ष्यला २१-१५, २१-१२, असं हरवलं.

पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यातही भारताच्या सात्विक साईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना पराभव पत्करावा लागला. चीनच्या लिआंग वी केंग, आणि वँग चँग या जोडीनं त्यांच्यावर १९-२१, २१-१४, २१-१७ अशी मात केली.

**<><><><><>**

ऊर्जा क्षेत्रात भारत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत असून परदेशी इंधनावरचं अवलंबित्व कमी होत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज आसाममधल्या गोलाघाट जिल्ह्यात बांबूपासून बनवलेल्या पहिल्या जैव शुद्धीकरण आणि जैव इथेनॉल प्रकल्पाचं उदघाटन तसंच नुमालीगड इथल्या पॉलीप्रोपीलीन प्लांटची पायाभरणी झाली, त्यावेळी ते बोलत होते. सौर ऊर्जेसंदर्भात भारताची गणना जगातल्या आघाडीच्या ५ देशांमध्ये होत असून खोल पाण्याखालच्या ऊर्जा स्रोतांचा वापर करुन भारत ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

त्याआधी प्रधानमंत्र्यांनी दरांग इथं १८ हजार ५३० कोटी रुपयांच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन केलं. दरंग वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, जीएनएम शाळा आणि बी.एससी नर्सिंग महाविद्यालयाची पायाभरणी देखील त्यांनी केली.

**<><><><><>**

राज्यात अनेक जिल्ह्यांमधे जोरदार पाऊस होत आहे. गेल्या चोवीस तासात मुंबई उपनगर, पालघर, रायगड, बीड आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमधे सर्वाधिक पाऊस झाला. सोलापूरमधे वीज पडून एक जणाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी आहे. नंदुरबारमधे घराची भिंत कोसळून एक जण जखमी झाला आहे.

मराठवाड्यात जायकवाडी धरण ९९ पूर्णांक ३४ शतांश टक्के भरलं असून, धरणातून मोठा विसर्ग सोडल्यानं गोदावरी नदीला पूर आला आहे. नदीकाठच्या अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, सतर्क राहावं, विनाकारण धोकादायक ठिकाणी जाणं टाळावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

बीड जिल्ह्यात गेल्या २४ तासांत एकूण सरासरी ४४ पूर्णांक ४ दशांश मिलिमीटर पावसाची नोंद झाली. एकूण ८६ मंडळांपैकी १६ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद आहे.

धाराशिव जिल्ह्यात काल झालेल्या जोरदार पावसामुळे नदीनाल्यांना आणि ओढ्यांना पूर आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात बामणी बल्लारशाह इथं वर्धा नदी इशारा पातळीवर वाहत आहे. आपत्कालीन परिस्थितीकरता सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनानं आपत्ती निवारण पथकांना दिल्या आहेत.

**<><><><>**

यवतमाळ जिल्ह्यातल्या प्रस्तावित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाला विरोध दर्शवण्यासाठी आज उमरखेड तालुक्यातल्या शेतकऱ्यांनी जनआक्रोश सभा घेतली. सुमारे ४२ गावांतल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन हा जलविद्युत प्रकल्प कायमचा रद्द करण्यासाठी एकमुखी ठराव मांडला.

**<><><><>**

सीबीआयनं नाशिकमध्ये दोन बेकायदेशीर कॉल सेंटर्सवर छापे टाकून एका सरकारी कर्मचाऱ्यासह पाच जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. विमा अधिकारी आणि सरकारी कर्मचारी असल्याचं भासवून युनायटेड किंग्डमच्या नागरिकांची फसवणूक केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//